# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २६/०४/२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्व सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिं.२६/०४/२०१० रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१.०५ वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त, डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ
०२. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०४. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०५. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०६. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०७. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
०८. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
०९. स.स.सौ.विजया संजय बनकर
१०. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
११. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
१२. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
१३. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
१४. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद
१५. स.स.सौ.मिटकर शोभा हरिश्चंद्र
१६. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
१७. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
१८. स.स.श्री.अ.रशिद खान मामु हमीद खान
१९. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल
२०. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
२१. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
२२. स.स.श्री.खान मुजीब मिर आलम खान
२३. स.स.श्री.खान निसार मोहम्मद खान
२४. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
२५. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
२६. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
२७. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२८. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
२९. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
३०. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
३१. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
३२. स.स.श्रीमती खान जहुराबी नासेर

३३. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
३४. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
३५. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
३६. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
३७. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
३८. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
३९. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
४०. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
४१. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट
४२. स.स.सौ.जैन अल्पा विकास
४३. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले

**चर्चा :**

श्री.अ.रशिद खान : वार्ड क्र.३१ च्या स.नगरसेविका यांचे पती पै.श्री.अ.कदीर यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना तसेच नक्षलवादी हल्ल्यात पोलीस अधिकारी व काही जवान शहीद झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अपर्ण करावी.

श्री.संजय शिरसाट, श्री.प्रशांत देसरडा : यास माझे अनुमोदन आहे.

श्री.गजानन बारवाल : नक्षलवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या ज्ञात-अज्ञात सर्वांना श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

मा.महापौर : ठिक आहे श्रंध्दाजंली अर्पण करण्यासाठी सर्वांनी उभे रहावे.

याचवेळी पै.श्री.अ.कदीर यांना तसेच नक्षलवादी हल्ल्यात शहीद पोलीस जवानांना सभागृहाच्यावतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रंध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.अ.रशिद खान : या बॉडीची ही शेवटची सभा आहे ५ वर्ष शहराच्या विकासासाठी मोठे कामे झालेली आहे. हे होत असतांना सदस्यांकडून अधिकारी कर्मचारी यांना अनावधानाने काही बोलून मन दुखवले गेले असेल तर दिलगिरी व्यक्त करतो नवनिर्वाचीत स.सदस्य यांचा सत्कार करतो.शिवसेना पक्षाचे २४ ऐवजी ३० तर काही भाजपाचे राष्ट्रवादी पक्षाचे ११ कॉग्रेस आय पक्षाचे २२ वरून १९ सदस्य निवडून आलेले आहे.त्यासाठी मी एक प्रस्ताव ठेवतो प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद महापालिकेच्या दिं.११.४.२०१० च्या नगरसेवकांच्या निवडणूकीत कॉग्रेस आय पक्षाला बहुमत मिळाले नाही त्यास येथिल पुर्वचे आमदार व उद्योगमंत्री मा.दर्डासाहेब संपुर्णपणे जबाबदार आहेत त्यामूळे त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा ताबडतोब द्यावा मा.दर्डासाहेब ३ वेळापासून आमदार म्हणून निवडूण येतात आणि त्याच सोबत खासदारासाठी कॉग्रेसचे उमेदवार पडता त्यांच्या मतदार संघात त्यांना मते मिळातात व खासदारांना त्यांच्या पेक्षा किती तरी कमी मतदान होते आताही पुर्व मध्ये त्यांना जेवढी मते मिळाली तेवढी मते पुर्वमध्ये असलेल्या कॉग्रेस नगरसेवकांना मिळाली नाही कितीतरी पटीने कमी मतदान झाले नगरसेवकांच्या निवडणूकीत त्यांनी कॉग्रेसचे व आघाडीचे अनेक उमेदवार पाडण्यासाठी सर्व प्रारे काम केले त्यांचे कर्मचारी यांचाही वापर केला व इतर मार्गाचाही वापर केला कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेसची

संयुक्त आघाडी असतांना अनेक वार्डात कॉंग्रेस आय व राष्ट्रवादी कॉंग्रेसची पक्षाचा चिन्हावर एकमेका विरूध्द लढले अनेक वार्डात लूज कॅंडीडेट दिले व अनेक वार्डात हेतुपुरस्कर लूज उमेदवार देवून विरोधकांना सोडले त्यांनी पक्ष विरोधात कार्यवाही केली ते मुळचे यवतमाळचे आहेत तेथील जनतेने त्यांना कधीच निवडून दिले नाही त्यांनी शहरात कॉंग्रेसची सत्ता घालवली व मुख्यमंत्री व पालकमंत्री यांचा घात केला त्यांनी पक्षाचे कधिच हीत पाहिले नाही फक्त स्वत:चे हीत पाहिलेले आहे राहूल गांधी व सोनीया गांधी यांच्या नावाचा वापर केला परंतु कॉंग्रेसचे महापौर बनण्यासाठी मनातून काम केले नाही, ते दलाल मार्फत काम करतात या सर्व कारणासाठी त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दयावा.

सुचक :श्री.अ.रशिद खान(मामू) अनुमोदक :श्रीमती मेहरून्नीसा खान

मा.महापौर :हा या सभागृहाचा विषय होत नाही

श्री.संजय सिरसाट :स.सदस्य श्री.अ.रशिद खॉन मामू यांनी जो प्रस्ताव मांडला तो त्यांचे पक्षाचे पक्षाध्यक्ष यांचेकडे पाठवावा.त्याची काय मागणी आहे ती त्यांनी त्यांचेकडे करावी

श्री.अ.रशिद खान :प्रस्ताव मंत्री पदाचा राजीनामा देण्या संदर्भात आहे ते एका पक्षाचे मंत्री नाही संपूर्ण शहरासाठी मंत्री आहे

श्री.संजय सिरसाट :जे मंत्री आहे त्यांना निवडून आणण्यामध्ये खरे तर स.सदस्यांचा सिहांचा वाटा होता. या सभागृहात विकासाच्या कामावर बोलणे संयुक्तीक आहे जेष्ठ स.सदस्य श्री.अ.रशिद खान मामू यांना असे वाटते की कॉंग्रेस आय पक्षाने इतर पक्षांमध्ये हातमिळवणी केली त्यामूळे कॉंग्रेस आय पक्षाला कमी जागा मिळाल्या.

श्री.अ.रशिद खान : तसे मी बोललो नाही विषय समजावून घ्यावा.

मा.महापौर :हा विषय या सभागृहाचा होत नाही कृपया त्यावर चर्चा करू नये विषय पत्रिकेला सुरूवात करण्यात येते.

श्री.सलीम खान :५ वर्षात मोठया प्रमाणात विकास कामे झाली सर्व पक्षाचे स.सदस्यांचे यासाठी सहकार्य लाभले अशा पध्दतीने पुढील बॉडीच्या स.सदस्यांनी कामे करावी अशी अपेक्षा करतो.

**<u>विषय क्र. १०६० :</u>**

दिनांक ०७.११.२००९,०९.१२.२००९,१९.१२.२००९ (दि.०९.१२.२००९ ची तहकूब सभा), २१.१२.२००९ (दि.१९.१२.०९ ची तहकूब सभा), २१.१२.२००९,२५.०१.२०१० व २०.०२.२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.सतीष कटकटे :दिनांक १९-१२-२००९ च्या सभेसाठी मी प्रश्न दिलेला होता त्यांचा अदयाप मला खुलासा मिळालेला नाही.

श्री.मुजीब खान :विषयपत्रिकेवर एकही प्रशासकीय प्रस्ताव नाही नुसते इतिवृत्त कायम करण्यासाठी सादर केले असे का? गरवारे येथील जागा लिजवर बीओटीने देण्याचा व इतर काही प्रस्ताव सभागृहात न येता इतिवृत्तात टाकलेले आहे त्यावर चर्चा झाली नाही ते सर्व रद्य करावे.

श्री.गजानन बारवाल :स.सदस्यांचे म्हणणे काय त्यावेळी प्रशासकीय ऐनवेळी प्रस्ताव आलेले होते.

श्री.मुजीब खान :विषयपत्रिकेवर एकही प्रशासकीय प्रस्ताव नाही फक्त मागिल सभांचे इतिवृत्त सादर केले असे करता येते का,प्रशासकीय प्रस्ताव का आलेले नाही.

नगरसचिव :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची ड प्रकरण-२ चे नियम १ (क) नुसार मा.महापौर यांना सभेची वेळ व दिनांक ठरविण्याचा अधिकार आहे त्यानुसार मा.महापौर यांनी नगरसचिव यांना सुचना दिल्यानुसार आजची सभा आयोजित केलेली आहे विषय पत्रिका वितरीत करणेच्या वेळेपर्यंत प्रशासनाकडील किंवा स.सदस्यांचे नगरसचिव विभागात प्रस्ताव आलेले नाही त्यामूळे फक्त इतिवृत्त कायम करण्याचा प्रस्ताव शिल्लक होता तो सादर केलेला आहे.

श्री.मुजीब खान : एकही प्रस्ताव नाही याची कल्पना मा.महापौरांना दिलेली होती का?

नगरसचिव : याची कल्पना मा.महापौरांना होती.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : ऐनवेळी इतिवृत्तात विषय टाकलेले आहे त्यावर चर्चा न होता आले कसे त्यास आमचा विरोध आहे ते रद्य करावे.

श्री.संजय सिरसाट :इतिवृत्तातील ठराव क्र.७७४ हा मशीनरी व यंत्रसामुग्री खरेदीसाठी ५.०० कोटीची तरतुद करण्याकरीता ऐनवेळी आलेला प्रस्ताव त्यावर चर्चा होणे आवश्यक होते. ऐनवेळी प्रस्ताव ठेवून तरतूद केली टेंडर काढले आता वर्क ऑर्डर देणार असे समजते असा मोठा निर्णय घेतांना सभागृहाचे मत लक्षात घेणे गरजेचे होते ते घेतलेले नाही त्यामूळे ऐनवेळी घेतलाला हा ठराव रद्य करावा. होत असलेली टेंडर प्रोसेस रद्य करावी.

श्री.सतीष कटकटे :यासंदर्भात टेंडरकाढले का प्रोसेस कुठपर्यत आली खुलासा घेण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल :या प्रस्तावावर चर्चा झालेली नाही सद्यस्थितीत आर्थीक परीस्थिती बरोबर नाही. रद्य करावा.

श्री.विनायक पांडे :टेंडर काढल्यावर रद्य करता येते का ?

सौ.लता दलाल :इतिवृत्त कायम न होता या कामाचे टेंडर कोणत्या नियमानुसार काढले.

मा.महापौर :हा शासकीय विषय होता मा.आयुक्तांनी या विषयी खुलासा करावा.

मा.आयुक्त :हा प्रशासकीय प्रस्ताव ठेवलेला होता सन २००९-१० या वर्षामध्ये १२ व्या वित्त आयोगामार्फत ५ कोटी रूपये अग्निशमन साहित्य खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आली होती.हा निधी १२ व्या वित्त आयोगाकडून उपलब्ध होईल असे ग्रहीत धरून अर्थसंकल्पात ८ कोटी ठेवले.

श्री.संजय सिरसाट : ठराव क्र. ७७४ विषयी बोलतो आहे अग्निशमन विभागाचा वेगळा विषय आहे त्यावर नंतर चर्चा करता येईल.दिं. ७-११-०९ च्या बैठकीतील विषय ७७४ पान क्र. १०९ वर आहे कोणताही प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे आल्यानंतर त्या ठरावास जोपर्यत कायम होत नाही तोपर्यत पुढील कार्यवाही करता येत नाही या आज इतिवृत्ताला मान्यता देत आहोत टेंडर प्रोसेस झालेली आहे का?

श्री.मनमोहनसिग ओबेरॉय : प्रत्येक सभेचे इतिवृत्त पूढील सभेच्या वेळी सादर करायला पाहिजे ४ महिण्याचे एकत्रित इतिवृत्त दिले त्यामूळे हा प्रकार होत आहे. जे आले ते सर्व मंजूर करावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :ऐनवेळी प्रस्तावांना यात कायम करायचे ५ कोटीचे साहित्य खरेदीचा प्रस्ताव आला एवढा खर्च करू शकतो का हे बघावे आर्थीक व्यवहाराचे जे विषय आहे ते रद्य करावे.

मा.आयुक्त : विषय क्र.७७४ प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेला होता. यामध्ये रस्त्याची साफसफाई,जलनि:सारण वाहिन्याचे चोकअप काढणे,फॉगींग फवारणीचे कामा संदर्भात Vehicle Mounted मशीनरी व यंत्रसामुग्री खरेदीसाठी मान्यता मिळाली होती.महापालिका फंडामधून अर्थसकंल्पात ५ कोटीची

तरतूद करण्यात आलेली होती टेंडर काढले ते अदयाप ओपन केले नाही, सध्या महापालिकेची आर्थीक परीस्थिती तशी फारशी चांगली नाही त्यामूळे यावर विचार व्हावा.

श्री.संजय सिरसाट :ऐनवेळी जरी प्रस्ताव सादर केला त्या ठरावाचे इतिवृत्त जोपर्यत कायम होत नाही तोपर्यत टेंडरची कार्यवाही करता येत नाही या प्रस्तावाचे टेंडर कशाच्या अधारे काढले माझे माहिती प्रमाणे हे टेंडर आणण्यासाठी सदर एजन्सील महापालिकेत दीड वर्षापासून कार्यरत होती.त्या ऐजन्सीचे प्रयत्न होते. यात आर्थीक व्यवहार सुध्दा झालेला असावा प्रस्ताव आता रद्य करणार तो भाग वेगळा परंतु जी मशीनरी मागवणार ते कर्मचारी महापालिकेकडे नाही.टेंडर ज्यांनी काढले त्यांचे स्पष्टीकरण घ्यावे टेंडरचा झालेला खर्च कुणाकडून वसुल करणार आहे.आताच प्रशासनाने म्हटले महापालिकेची आर्थीक परीस्थिती चांगली नाही प्रशासनाच्या मताशी आम्ही सहमत आहोत.काढलेले टेंडर त्वरीत रद्य करावे.या प्रोसेससाठी झालेला खर्च का व कशामूळे कुणाच्या चुकीमूळे झाला याची चौकशी करावी अहवाल मागवावा.

श्री.गजानन बारवाल : प्रस्ताव रद्य करावा. माझी विनंती चौकशी मा.आयुक्तांनी करावी.

मा.महापौर : इतिवृत्तातील ठराव क्र. ७७४ हा मागिल बैठकीत ऐनवेळचा प्रस्ताव होता या कामाकरीता अर्थसंकल्पात तरतूद केली होती म्हणून सभेपूढे येवून त्यास पारीत करण्यात आले इतरही अनेक विषय आलेले होते.काही स.सदस्यांचे प्रस्ताव होते. ऐनवेळला मंजूर केले.

सौ.लता दलाल :प्रस्ताव पारीत केलेला नव्हता तसे असते तर त्यावर चर्चा झाली असती ऐनवेळी टाकण्यात आला पारीत केलेला नव्हता

श्री.अ.रशिद खॉन मामू :निधी उपलब्ध नसेल तर प्रशासनाने नामंजूर करावे शासनास तसे कळवावे.

श्री.किशनचंद तणवानी :हा प्रशासकीय प्रस्ताव होता ऐनवेळी घेतलेला आहे.त्यावेळेस गरज होती आता नाही असे प्रस्ताव रद्य करावे.

श्री.गजानन बारवाल : ऐनवेळी फक्त स्थायी समितीकडील व प्रशासनाचेच प्रस्ताव घेता येतात. सभागृहाची भावना लक्षात घेता हा प्रस्ताव रद्य करावा.

मा.महापौर :आताच मा.आयुक्तांनी खुलासा केला महापालिकेची आर्थीक परीस्थिती फारशी चांगली नसल्यामूळे ठराव क्र.७७४ रद्य करण्यात येतो.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : विषय क्र.१०१४ बीओटीस आमचा विरोध आहे. चर्चा झाली नाही रद्द करावे.

श्री.गजानन बारवाल :इतिवृत्तातील विषय क्र.९५८ हा अग्निशमन दलामध्ये साहित्य खरेदीचा प्रस्ताव ठेवलेला होता त्यावेळी सभागृहात माहिती दिलेली होती आहे. ३-४ चेसीस अनेक दिवसापासून धुळखात पडून आहे त्या कार्यान्वित करणे आवश्यक आहे.जे आवश्यक साहित्य घेणे गरजेचे आहे तेच घ्यावे उर्वरीत रद्य करावे.

मा.महापौर : अग्निशमन दलाचे प्रस्ताव गरजेचे आहे.

श्री.संजय सिरसाट :या प्रस्तावानुसार छोटया गल्लीमध्ये जातील अशा गाडया खरेदीचे ७५-७५ लक्षचे टेंडर झालेले आहे.आतापर्यत हा प्रस्ताव का आलेला नाही ४ चेसीस २-३ वर्षापासून पडून आहे त्याची अवस्था काय असेल माहित नाही त्यावर यापूर्वीच खर्च करायला पाहिजे होता परंतु उशीर केला आता दुमत असण्याचे कारण नाही.परंतु यात ५ कोटी प्रस्तावावामध्ये जे १२ व्या वित्त

आयोगाचे पैसे आल्यावर ३६ मी.उचींची परवानगी आजपर्यंत दिली नाही.त्या सीडी खरेदीसाठी १२ व्या वित्त आयोगामधून खर्च करणार आहे. १२ व्या वित्त आयोगाचे पैसे आता येणार नाही १३ वा वित्त आयोग चालू होईल आतापर्यंत पैसे प्राप्त झाले नाही जेंव्हा १३ व्या वित्त आयोगाचे पैसे येतील त्यावेळी टेंडर काढावे फक्त ज्या ४ चेसीस व ज्या लहान गल्ल्यामध्ये जाणा-या गांडयाचे काम करावे.

मा.महापौर : १२ व्या व १३ व्या वित्त आयोगातून मिळणारे अनुदानातून काम करावे. ज्या चेसीस येवून पडलेल्या आहे त्यांचे इतर जी तातडची कामे आहे ती प्रशासनाने करावी. शासनाकडून जो काही फंड मिळाले त्यातून ती कामे करावे. चेसीचची कामे अगोदर करून घ्यावी हा बदल यात करण्यात येतो.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : १०१४ क्रमांकाचा ठराव बीओटी संदर्भात आहे रद्य करावे महापालिकेकडे निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे हे काम करावे.

श्री.गजानन बारवाल : बीओटी वर अनेक योजना राबविल्या चांगल्या प्रकारे काम होत असेल तर सहकार्य करावे परंतु महापालिकेच्या माध्यमातून करता येत असेल तर मंजूरी देण्यास हरकत नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :बीओटी करण्याला आमचा विरोध होता आता सुध्दा आहे.आमचा विरोध नोंदवावा.

श्री.सलिम खान : या शहरात चांगली कामे झाली आहे.

श्री.किशनचंद तणवानी :या प्रस्तावाविषयी माहिती घ्यावी.

श्री.गजानन बारवाल :ऑलरेडी ७८ लक्ष तेथे खर्च झालेले आहे त्याची सुध्दा माहिती दयावी.

कार्य.अभियंता-ब व क :गरवारे स्टेडीयममध्ये जलतरण तलाव बांधणे आणि इतर काही सुविधा त्यासाठी २.५० कोटीचे टेंडर काढले होते.एलोरा कन्स्ट्रक्शन यांना १५ टक्के अबाऊ प्रमाणे दिं. ११-०५-२००७ रोजी कार्यादेश दिलेले होते.जो प्रस्ताव दिला तो भागशः बीओटीचा होता.मुख्य जलतरण तेथील पुलाचे तसेच बॅलेसींग टँक याचे आरसीसीचे काम पुर्ण झालेले आहे.आतापर्यंत ७८.२२ लक्ष खर्च झालेला आहे.अटी शर्तीनुसार सुरूवातीला २.५० कोटी ठेकेदाराचे खर्च करावे. त्या ७७ टक्के आपण काम पुर्ण झाल्यानंतर ३ वर्षे संबधीताने चालवायचे जे काही उत्पन्न येईल ते त्यांनी घ्यायचे

श्री.संजय सिरसाट :पुर्वी या कामाचे टेंडर निघाले होते का? ७८.२२ लक्ष खर्च केले ते टेंडर किती रक्कमेचे होते.त्याची देयके दिलेले आहे असे म्हटले आहे.ही एजन्सी कोणती होती पहिले रद्य करून हे बीओटीचे काढले काय?

कार्य. अभियंता -ब व क :मुळ टेंडर हे २.५० कोटीचे १५ टक्के अबाऊने मे -२००७ मध्ये त्याची वर्क ऑर्डर दिली त्याप्रमाणे काम सुरू झाले जलतरण तलावाचे आरसीसीचे काम पुर्ण झालेले आहे ७८.२२ लक्ष हे जे मुळ टेंडर आहे त्यातील खर्च झाले त्यातील ७७ टक्के पेमेंन्ट दिलेले आहे. २३ टक्के महापालिका ठेवून घेणार जसजसे काम होईल त्यानुसार ७७ टक्क्ेच पेमेन्ट त्यांना दिले जाईल. २.५० कोटीचे काम पुर्ण झाल्यानंतर ७७ टक्केच रक्कम एजन्सीला देणार ३ वर्ष एजन्सीने चालवाचे जे उत्पन्न येईल एजन्सी घेईल त्यानंतर तो प्रकल्प महापालिकेकडे हस्तांतर करून घेणार व अशाप्रकारे ते टेंडर होते. महापालिकेची आर्थीक परीस्थिती चांगली नाही म्हणून कामे बंद ठेवावी असे तत्कालीन आयुक्त श्री.बंड साहेब यांचे आदेश होते. ८ महिणे काम बंद ठेवले होते पुन्हा ठेकेदाराचा तगादा सुरू झाला यात

एक्सीलेशनचा ॲटम आहे या प्रकल्पास उशीर होईल तसतसा खर्च वाढत जाईल. आता हा जो प्रकल्प प्रस्तावित केला त्याचे टेंडर देखिल काढले महापालिकेची आर्थीक स्थिती अशी की एजन्सीला पैसे देवू शकत नाही केलेला खर्च पडून राहिल शिवाय त्या ठेकेदाराचे देणे पण लागते या दृष्टीने मार्ग कसा काढायला त्या प्रकल्पाची इम्प्लीटेशन झाले पाहिजे म्हणून हा प्रकल्प बीओटीमध्ये प्रस्तावीत केलेला आहे.आता जो कुणी प्रकल्प घेईल त्यांनी महापालिकेची खर्च झालेली रक्कम एकदम भरणा करायची आणि नियोजीत जो प्रकल्प आहे तो पुर्ण करायचा आणि दर वर्षी त्यांनी महापालिकेला प्रीमीयम दयायचा दर ३ वर्षाला १० टक्के वाढ करून असे ३५ वर्षापर्यत प्रिमीयम दयायचा. ३५ वर्षानंतर सदर प्रकल्प जशाचा तसा महापालिकेला हस्तांतर करणार.

श्री.किशनचंद तणवाणी :सन २००७ मध्ये २.५० कोटीचा प्राजेक्ट होता त्यातून ७७ लक्ष खर्च झाला त्यातील २३ टक्के रक्कम महापालिकेकडे आहे आता १.५० फक्त प्रोजेक्ट आहे तेवढी रक्कम महापालिका गुंतवू शकत नाही का? प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.मनमेहनसिंग ओबेरॉय :सन २००७ पासून आजपर्यत अनेक कामे केली २.५० कोटीचा प्राजेक्ट १ कोटीचे काम झाले उर्वरीत १.५० कोटी महापालिका खर्च करू शकत होती. एक प्रोजेक्ट सोडून दुसरा कार्यान्वित करणे ५०० कोटीचे बजेट ३ वर्षापासून तरतूद केली जाते तरी ही काम होत नाही पुन्हा बीओटीवर करण्याचा सादर करायचे व त्यास समर्थन दयायचे हे बरोबर नाही.त्यात तरतूद होते काम करायचे नाही पुन्हा बीओटीवर आणायचे हे बरोबर नाही.७८ लक्ष दिले त्याचे व्याज किती होते लोकांना एकीकडे सुविध मिळात नाही दुसरीकडे बीओटीचे प्रस्ताव येतो हे बरोबर नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :ऑलरेडी या प्रोजेक्टवर ७८ लक्ष खर्च केले. आलेला प्रस्ताव बरोबर आहे. एवढा मोठा खर्च करून ही प्रोजेक्ट बदं असणे हे प्रशासकीय दृष्टीने योग्य नसेल. बजेटमध्ये या कामासाठी तरतूद करून राहिलेले काम महापालिकेच्या माध्यमातून पूर्ण करावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:शेवटची सभा आहे चांगले काम केल्याची प्रशंसा करणार होतो परंतु असे प्रस्ताव टाकून झालेल्या चुका दुरूस्त करण्या बाबात बोलण्याची वेळ आली दु:ख वाटते.

श्री. संजय सिरसाट :या बॉडीची ही शेवटची सभा आहे.या प्रस्तावाच्या संदर्भात अनेक पेपरला छापून आले सभागृहात गोंधळ झाला त्यात काही प्रस्ताव मंजूर झाले त्याची परीमीती अशी झाली की त्यामूळे या शहराला काही तरी भोगावे लागते असे चित्र निर्माण झाले.इतिवृत्त कायम करण्यास मोठया प्रमाणात सादर केले त्यांचे वाचन होणे अवघड झाले या इतिवृत्ताच्या माध्यमातून कोणतेही चुकीचे काम जाता जाता घडवू नये अशी प्रत्येक सदस्यांची भावना आहे. त्या भावनाचा मी आदर करतो.यापूर्वीही बीओटीचे प्रस्ताव मंजूर केले परंतु बीओटीची कमेटीकडून ते प्रस्ताव अंतिम होवून सर्वसाधारण सभेकडे येवून त्यावर चर्चा होवून निर्णय होत असे यात अनेक ऐनवेळचे प्रस्ताव आले सदर प्रस्ताव दिं. २०-२-२०१० च्या सभेत झाला घेतला इतिवृत्त आज समोर आले ५ कोटीचे साहित्य खरेदीचा प्रस्ताव ऐनवेळी येतो ते इतिवृत्त कायम होण्याच्या अगोदर टेंडर प्रोसेस होते हा ही प्रस्ताव त्याच माध्यमातून आलेला आहे.ही महापालिकेची मालमत्ता आहे ३५

वर्षासाठी जागा देतो वार्डातील लहान मोठया कामासाठी स.सदस्य, अधिकाऱ्यांना विनवणी करीत काम करावे म्हणून मागणी करीत होते आता बीओटीवर प्रस्ताव येतो. यापूर्वीही सभागृहाचे एक सम्मतीने निर्णय घेतलेले आहे. ७८ लक्षचे काम झालेले आहे ज्यांनी काम केले तोच बीओटीवर काम घेण्यास तयार असेल १.२५ कोटी रक्कम देत नाही तर त्यावर १८ टक्केनी व्याज आकारले जाईल अशी अटी टाकलेल्या आहे. व्याज लावले जाईल जोपग्रत मंजूरीच देत नाही तर अटी शर्ती का सादर केल्या समजले नाही. हा जलतरण तलाव होईल अनेक लोक आनंदी होतील तेथे पोहण्यासाठी जातील असा भाग नाही शहरात ज्योतीनगर,सिध्दार्थ उद्यान, विदयापीठ मध्ये जलतरण तलाव आहे तेथे किती लोक आज जातात हा जलतरण तलाव झाला नाही म्हणून लोक इतर ठिकाणी जागणार नाही अशातला भाग नाही. अनेक पर्यायी माध्यम असतात ज्या रस्त्याची गरज नव्हती ते बीओटीवर रस्ते केले.वाईट अवस्था झाली.१.२५ कोटी लागणार होते २०१० पर्यत पूर्ण झाला नाही तर २.०० कोटी लागतील महापालिकेची मालमत्ता कुणाच्या हातात देवू नये जो तेथे जाईल तो त्याचा मालक होतो याचा अनुभव आपल्याला आहे.बीओटीवर दिलेला महापौर बंगल्याच्या बाजूचा शहानुरवाडी येथील दिलेला प्रोजेक्ट अजूनही झाले नाही त्या माध्यमातून येणारे उत्पन्न महापालिकेला मिळाले नाही ते का पूर्ण झाले नाही याचे उत्तर अधिकारी देणार नाही ते आपल्याला जनतेसमोर दयावे लागते.अशा प्रोजेक्टमध्ये अधिकारी किंवा इतर कुणी गुंतलेले असतात त्यात महापालिकेचे कोटयावधीचे नुकसान होते. अधिकाऱ्याकडे कुणी बोट दाखवित नाही जे सभागृहाकडे बोट दाखवितात. विनंती की १.५० कोटी साठी महापालिकेची मालमत्ता संबधीताच्या ताब्यात देवू नये बीओटीवर हे काम देवू नये महापालिकेच्या माध्यमातून हे काम करावे. हा प्रस्ताव त्वरीत रद्य करावा.

मा.महापौर :विषय क्र. १०१४ संदर्भात चर्चे विना हा प्रस्ताव मंजूर करणे बरोबर नाही असे सभागृहाचे मत आहे.या प्रस्तावानुसार उर्वरीत जे १.५० कोटी रूपये लागणार तेवढी रक्कम महापालिका तरतूद करू शकते येणाऱ्या बजेटमध्ये यासाठी तरतूद करावी व हा प्रोजेक्ट महापालिकेच्या माध्यमातून पूर्ण करावा. विषय क्र.९८९ मध्ये दुरूस्ती करावी. यात स्थायी समितीच्या आदेशाची अंमलबजावणी करावी, अशी दुरूस्ती करण्यात येते.

श्रीन्मनमोहनसिंग ओबेरॉय : गेल्या ५ वर्षात विकास कामे करणेसाठी अधिकारी/कर्मचारी स.सदस्य यांनी जी मदत केली त्या सर्वांचे आभार मानतो नवनिर्वाचीत स.सदस्यांना पुढील काळात विकास कामे करणेच्या शुभेच्छा देतो.

श्री.अ.रशिद खान :जलतरण तलावाचे उत्पन्न वाढविण्यासाठी मा.आयुक्तांनी जातीने लक्ष दिले मोठया प्रमाणात उत्पन्न येते त्याबध्दल प्रशासनाचे अभिनंदन करतो.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर नगरसेवक झाल्यामूळे बरीचशी माहिती मिळाली ५ वर्ष सर्वानी विकासाची कामे करण्याकरीता मदत केली तसेच सन २०१० मध्ये नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणूक शांततेत पार पडली, प्रशासनाने चांगले काम केले त्याबध्दल प्रशासनाचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. नवीन स.सदस्यांना शुभेच्छा.

श्री.गजानन बारवाल :विकास कामासाठी अधिकारी कर्मचारी सर्व पदाधिकारी स.सदस्य यांनी मदत केली त्याबध्दल सर्वांचे अभिनंदन करतो.

| | |
|---|---|
| सौ.लता दलाल | :नवनिर्वाचीत सदस्यांचे हार्दीक अभिनंदन करते.गेल्या कार्यकाळात सर्व अधिकारी कर्मचारी यांनी सहकार्य केले सर्वाचे आभारी आहोत यापूढेही असेच सहकार्य ठेवावे अशी भावना व्यक्त करते.जे महिला सदस्य आहेत त्यांना जेष्ठ सदस्य यांनी समजावून घ्यावे. |
| श्री.किशनचंद तणवानी | :विषय क्र.८७३ च्या संदर्भात तातडीने अमलबजावणी करण्याचे प्रशासनाला आदेशीत करावे. |
| मा.महापौर | :प्रशासनाने या बाबतीत तातडीने अमलबजावणी करावी |
| श्रीमती रजणी जोशी | :गेल्या ५ वर्षात विकास कामासाठी सर्वानी मदत केलेली आहे.मा.आयुक्त यांचे मोठे सहकार्य लाभले त्याबध्दल सर्वाची आभारी आहे.माझे वार्डातील स्मशानभूमीचे काम अर्धवट राहिलेले आहे ते पूढील काळात करण्याच्या सुचना प्रशासनाला देण्यात याव्यात. |
| मा.महापौर | :स.सदस्या सौ. जोशी रजनी यांनी जी सूचना केली त्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.गेल्या ५ वर्षात सर्वांनी मिळूनमिसळून विकास कामे करण्यास मदत केली काही वेळा मतभेद झाले परंतू मनभेद झालेले नाही. शहराच्या विकासासाठी सर्वांनी मनापासून प्रयत्न केले. त्याबध्दल सर्वांचे मनापासून कौतून व अभिनंदन करते.नवीन बॉडी सूध्दा शहराच्या विकासासाठी कटीबध्द असणार आहे. नवनिर्वाचीत सदस्यांचे या सभागृहाच्या वतीने स्वागत व पूढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देते. |

**ठराव :**

विषय क्र.१०६० विविध सभांचे इतिवृत्तासंबंधात सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावित दुरूस्त्यासह दिनांक ०७.११.२००९,०९.१२.२००९,१९.१२.२००९ (दि.०९.१२.२००९ ची तहकूब सभा), २१.१२.२००९ (दि.१९.१२.०९ ची तहकूब सभा), २१.१२.२००९,२५.०१.२०१० व २०.०२.२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यांत येते.

या बरोबरच सभा राष्ट्रगिताने संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगरसचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद